# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- *jtdirrom@gmail.com* *website – www.jdteromumbai.com*


परिपत्रक
**ऑनलाईन अर्जाबाबत**

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१६/247

दिनांक : 22 JAN 2016

प्रति,
सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत. . . . . . . . . . . . .
**(शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता ऑनलाईन अर्ज भरुन घेणेबाबत)**

संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक १. क्र. ४/विकामुं/तंशि/ईबीसी/२०१५/३६४६, दि. २९/१२/२०१५
२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र
क्र. १५/तंशिसं/अर्थसं/ईबीसी/ऑनलाईन/२०१५-१६/२१८, दि. २०/०१/२०१६

संदर्भीय क्र.१च्या पत्रान्वये सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित एमबीए, एमसीए, अभियांत्रिकी पदवी/पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालयांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेशित आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबतचे ऑनलाईन अर्ज तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावरील EBC Concession या लिंकवर भरुन घेण्याकरिताची तरतूद उपलब्ध करुन देण्यांत आली होती. सदर अर्ज भरुन घेण्याचा कालावधी दि. १५/०१/२०१६ पर्यंत ठेवण्यांत आला होता. तसेच संस्थांनी दि. २०/०१/२०१६ पर्यंत संस्थांनी प्राप्त झालेल्या ऑनलाईन फॉर्म्सची छाननी करुन सदर अर्ज ऑनलाईन फॉरवर्ड करण्याबाबतच्या सूचना देण्यांत आल्या होत्या.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतचा अंतिम दि. १५/०१/२०१६ असा होता. व त्याबाबत संस्थानी विद्यार्थ्यांना सूचना फलकावर सूचना लावण्याबाबत तसेच संबंधीत विद्यार्थ्यांच्या वर्गामध्ये सदर सूचना वाचून दाखविण्याबाबत कळविले होते. व एकही विद्यार्थी ह्या योजनेपासून वंचित राहणार नाही. याची काळजी संस्थांनी घ्यावी. असे कळविण्यांत आले होते. तरीही असे कळते की, ज्या विद्यार्थ्यांनी ऑफलाईन फॉर्म्स भरले होते अशा काही विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म्स भरलेले नाहीत. तसेच काही विद्यार्थ्यांचे तांत्रिक अडचणींमुळे फॉर्म्स भरले गेलेले नाहीत.

**ह्याबाबत असे कळविण्यांत येते की, ज्या विद्यार्थ्यांचे फॉर्म्स तांत्रिक अडचणीमुळे भरले गेलेले नाहीत. केवळ अशा विद्यार्थ्यांबाबत संस्थेने सदर विद्यार्थ्यांचे नाव, त्याचा ॲप्लिकेशन आयडी, पासवर्ड, तसेच कोणती तांत्रिक अडचण आली होती. याबाबत पत्र घेऊन दि. ३०/०१/२०१६ पर्यंत ह्या कार्यालयात उपस्थित राहून अशा विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन घेण्याची कार्यवाही पूर्ण करावी.**

...२.

ऑनलाईन अर्जासोबत खालील कागदपत्रे असणे अनिवार्य आहे.

**(ज्या संस्थांनी या आधीच ऑफलाईन फॉर्मसोबत मूळ कागदपत्रे सादर केली आहेत. त्यांनी पुन्हा कागदपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.)**

१. ऑनलाईन अर्ज
**(अर्जाच्या शेवटी विद्यार्थी व विद्यार्थ्याच्या पालकाची स्वाक्षरी व त्याखाली प्राचार्य/संचालकांची स्वाक्षरी अनिवार्य आहे.)**
२. ऑनलाईन अर्जाची रिसिट कम ॲकनॉलेजमेंट
**(अर्जाच्या शेवटी केवळ प्राचार्य/संचालकांची स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.)**
३. मूळ उत्पन्नाचा दाखला
४. डोमिसाईल सर्टिफिकेट किंवा लिव्हींग सर्टीफिकेट (दोन्ही सर्टिफिकेट्स उपलब्ध नसतील तरच जन्म दाखला)
५. मागिल वर्षाच्या गुणपत्रिका (विद्यार्थ्याच्या गुणपत्रिकेवर FAIL असे नमूद केलेले असल्यास पुढील वर्षात प्रवेशासाठी पात्र असल्याबाबतचे प्राचार्यांचे साक्षांकन [Attestation] असणे अनिवार्य आहे.)
६. रेशनकार्डची छायांकीत प्रत
७. गॅप असल्यास मूळ प्रतिज्ञापत्राची नोटरी असलेली प्रत (Original affidavit should be submit)
८. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ ची शुल्क जमा पावती
९. वडील हयात नसल्यास मृत्यू दाखला (आईच्या नावे उत्पन्नाचा दाखला असल्यास)
१०. आधार कार्डाची छायांकीत प्रत
११. पासबुकची छायांकीत प्रत (पासबुक केवळ विद्यार्थ्यांच्या नावे असावे. संयुक्त खाते असलेल्या पासबुकची प्रत नसावी.)
१२. ५० टक्के शिक्षण शुल्कापेक्षा उत्पन्न कमी असल्यास ज्यांच्याकडून अर्थसहाय्य घेतले त्यांचे मूळ प्रतिज्ञापत्र / शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास बँकेचे प्रमाणपत्र
१३. स्वयं सांक्षाकन घोषणापत्र (विद्यार्थ्याने स्वयं सांक्षाकन केले असल्यास)
१४. केंद्रिभूत प्रवेश घेतलेल्या अलॉटमेंट लेटरची प्रत

**सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, दि. ३०/०१/२०१६ पर्यंत ऑनलाईन फॉर्म्स या कार्यालयाकडे विनाविलंब सादर करावेत.**

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई